सदैव तत्पर, सदैव मदतीस
दुरध्वनी क्र.०२२-२३०८००२३
फॅक्स क्र. ०२२-२३०८००२४

महाराष्ट्र शासन
अपर पोलीस आयुक्त,
दक्षिण प्रादेशिक विभाग,मुंबई.
सर जे जे मार्ग, ह्युम हायस्कुल समोर,
नागपाडा, मुंबई - ०८.
E mail ID-cp.mum.addlcp.south@mahapolice.gov.in

जा.क्र. १८५ /अपोआ/दप्रावि/वा/ २०२३ दिनांक :- २९ /०४/२०२३

प्रति,

पोलीस उप आयुक्त,
परिमंडळ -१, मुंबई

**विषय** :- पोलीस शिपाई /पोलीस शिपाई (चालक) भरती -२०२१ लेखी परीक्षा बाबत..

दिनांक २९/०४/२०२३ रोजी मा. पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई यांनी ०७ मे व १४ मे रोजी होणाऱ्या अनुक्रमे पोलीस शिपाई व पोलीस शिपाई (चालक) भरती -२०२१ लेखी परीक्षेच्या अनुषंगाने बैठकीचे आयोजन केले होते.

सदर बैठकीत मा. पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई यांनी दिलेल्या निर्देशाप्रमाणे खालील प्रमाणे सूचना देण्यात येत आहेत.

०१ लेखी परीक्षेच्या अनुषंगाने पोलीस उप आयुक्त, केंद्र प्रमुख, पर्यवेक्षक व उमेदवार यांच्याकरिता माहिती पत्रक देण्यात येणार आहेत. सदर माहिती पत्रकात नमूद केल्याप्रमाणे परीक्षेदरम्यान कार्यवाही करण्यात यावी.

०२ दक्षिण प्रादेशिक विभागात परिमंडळ -१ मध्ये ०८, परिमंडळ -०२ मध्ये ०७ व बंदर परिमंडळात ०१ अशी एकूण १६ परीक्षा केंद्रे आहेत. सदर सर्व परीक्षा केंद्रावर केंद्र प्रमुख म्हणून पोलीस निरीक्षक दर्जाच्या अधिकाऱ्याची नेमणूक करण्यात यावी.

०३ संबंधित परिमंडळाच्या पोलीस उप आयुक्त यांनी सर्व केंद्र प्रमुख पोलीस निरीक्षक यांची आजच बैठक घेऊन त्यांना मार्गदर्शन करावे.

०४ दक्षिण प्रादेशिक विभागातील १६ परीक्षा केंद्रांवर परिमंडळ - १ मध्ये १३०, परिमंडळ -२ मध्ये १३१ व बंदर परिमंडळात ३० असे एकूण २९१ वर्ग उपलब्ध होणार आहेत. सदर वर्गावर पर्यवेक्षणाकरिता पोलीस ठाण्यास कार्यालयीन काम करणाऱ्या, तसेच पर्यवेक्षणाचे काम करू शकतील अशा हुशार अंमलदारांची नियुक्ती करावी.

०५ ज्या वर्गात २४ उमेदवार असतील तेथे ०१ पर्यवेक्षक व जेथे २४ पेक्षा जास्त उमेदवार असतील तेथे ०२ पर्यवेक्षकांची नेमणूक करण्यात यावी.

०६ भरती परीक्षेकरिता उपलब्ध वर्गांनुसार आवश्यक पर्यवेक्षकां पेक्षा १० टक्के जास्त पर्यवेक्षकांची निवड करावी, जेणेकरून परीक्षेच्या दिवशी एखादा पर्यवेक्षक उपस्थित राहू शकला नाही तर त्याच्या ऐवजी पर्यायी अंमलदाराची पर्यवेक्षक म्हणून नेमणूक करणे शक्य होईल.

०७ परिमंडळीय पोलीस उप आयुक्त यांनी दि. ०१/०५/२०२३ रोजी वर्गावर पर्यवेक्षक म्हणून नेमण्यात येणाऱ्या अंमलदारांकरिता प्रशिक्षण सत्र आयोजीत करावे.

०८ दक्षिण व मध्ये प्रादेशिक विभागातील बहुतांश केंद्र हे महिला उमेदवारांकरिता देण्यात येणार आहे. त्याकरिता महिला उमेदवारांच्या Checking & Frisking करिता महिला अंमलदारांची नेमणूक करावी.

०९ त्याचप्रमाणे महिला उमेदवार असलेल्या परीक्षा केंद्रांवर जास्तीत जास्त महिला अधिकारी व अंमलदार यांची नेमणूक करावी. तसेच महिला उमेदवार असलेल्या ज्या वर्गांवर पुरुष अंमलदार पर्यवेक्षक म्हणून असतील त्या मजल्यावर एका तरी महिला अधिकारी व अंमलदाराची नेमणूक करण्यात यावी.

१० लेखी परीक्षेच्या दिवशी सकाळी ०५ .०० ते ०७.०० वा. च्या दरम्यान नायगांव येथून लेखी परीक्षा साहित्याचे वाटप करण्यात येणार आहे. सदर साहित्य आणण्याकरिता प्रत्येक पोलीस ठाण्याने पो.नि. दर्जाच्या अधिकाऱ्याची नेमणूक करून परीक्षा केंद्र निहाय एक वाहन नायगांव येथे पाठवुन साहित्य ताब्यात घ्यावे व सदरचे साहित्य सुरक्षितपणे व वेळेत परीक्षा केंद्रावर पोहोचेल याची दक्षता घ्यावी.

११ त्याचप्रमाणे प्रत्येक परीक्षा केंद्रावर उमेदवारांची बायोमेट्रीक तपासणी करण्याकामी व फोटोग्राफ्स काढण्याकामी प्रत्येक एका पथकाची नेमणूक करावी व तसे बंदोबस्त आदेशामध्ये नमूद करावे.

उपरोक्त सूचनांचे तंतोतंत पालन करून पोलीस शिपाई /पोलीस शिपाई (चालक) भरती -२०२१ लेखी परीक्षा सुरळीत पार पडेल याची सर्वांनी दक्षता घ्यावी.

२९/०४/२३

**( डॉ. अभिनव देशमुख )**
अपर पोलीस आयुक्त,
दक्षिण प्रादेशिक विभाग मुंबई